पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८२**

**सभावृत्तांत**

दिनांक – **११/०८/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ११/०८/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
११) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१२) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१३) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१४) मा.काळे विमल रमेश
१५) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१६) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे – सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे – सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.गायकवाड, मा.माने, मा.माछरे, मा.फुंदे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.पठाण, मा.लडकत, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.शेख, मा.गायकवाड - कार्यकारी अभियंता, मा.पाटील, मा.बोदाडे, मा.बेंडे, मा.बहुरे - प्रशासन अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक ३२) :- मुकाई चौक, किवळे ते भक्ति शक्ति चौक निगडी या ४५ मी. रुंद रस्त्यावर देहूरोड ते आकुर्डी रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे किमी १७०/१६-१७ मधील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलासाठी (ROB) मध्य रेल्वे पुणे यांचेकडे CODAL & MAINTENANCE शुल्कापोटी रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक ३३) :- मा.आयुक्त निवासस्थान, अविष्कार बंगला येथील १०० KVA क्षमतेचे जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम करणेबाबत...

विषय क्रमांक ३४) :- सन २०१५-१६ या वर्षामध्ये मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी मोठी रोपे खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ३५) :- से.नं.२४ निगडी संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील उपहारगृह इमारत पहिला मजला ५ वर्ष कालावधीसाठी लिज दराने देणेबाबत...

विषय क्रमांक ३६) :- दुर्गादेवी उद्यानातील झाडांचे खोडे काढणे, खड्डे खोदणे, रस्ता तयार करणेकामी पोकलेन भाड्याने घेणे व पोकलेन वाहतुक करणेबाबत...

विषय क्रमांक ३७) :- तरतुद वर्ग करणेबाबत–मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८) :- मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणेबाबत-मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.११७०२ दि.९/६/२०१५ रद्द करणेबाबत व पिं.चिं. मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाढ,घट मंजुर करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) :- मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) :- सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२) :- सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३) :- सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२०२३ दि.२१/७/२०१५ रद्द करणेबाबत व ड क्षेत्रीय कार्यालय व मुख्यालयामध्ये तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५) :- तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६) :- सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क प्रभाग व क मुख्यालयातील विशेष योजना व भांडवली विषयक कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७) :- तरतुद वर्ग करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४८) :- मा.स्थायी समिती ठ.क्र.१२१३८ दि.४/८/२०१५ मध्ये मजकूर समाविष्ट करणेबाबत - मा.अनिता तापकीर,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४९) :- 'ड' व 'ब' प्रभाग कार्यक्षेत्रातील टाटा एसी घंटागाडीमार्फत घरोघरचा कचरा उचलणेबाबत-मा.अनिता तापकीर,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

अ) दिनांक २८/०७/२०१५ व ४/८/२०१५ (स. १०.४५ व स. ११.३० वा.) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ४/८/२०१५ (स. ११.०० व स. ११.४५ वा.) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – १२१३९ विषय क्रमांक – १
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/२३२/१४ दि.१५/३/२०१४

विषय - प्रभाग क्र.३१ दिघी व इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार दिनांक १५/०९/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४० विषय क्रमांक – २
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/२५१/२०१४ दि.२०/५/२०१४

विषय - अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेसाठी यंत्र सामग्री पुरविणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार दिनांक १५/०९/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४१ विषय क्रमांक – ३
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/४४/१५ दि.२०/२/२०१५

विषय - प्र.क्र५८ इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार दिनांक १५/०९/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४२ विषय क्रमांक – ४
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/५५/२०१५ दि.११/६/२०१५
विषय - प्र.क्र.७ च-होली पुणे आळंदी रस्ता ते खाणीचा रस्ता डांबरी करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४३ विषय क्रमांक – ५
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१३अ/कावि/१५२/१५ दि.१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४४/२०१४-१५ मधील अ.क्र.०४ अन्वये, प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते म्हाळसाकांत चौकापर्यंतचा रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.व्यंकटेश्वरा कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२९,४०,४७५/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख चाळीस हजार चारशे पंच्याहत्तर) पेक्षा ३६.३६% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १९,६४,८८४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच भाववाढ कलम नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी नुसार भाववाढ देय असल्यास कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकांची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४४ विषय क्रमांक – ६
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२९३/२०१५ दि.२१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१८/३३/२०१४-१५ मधील अ.क्र.१३ अन्वये, जलक्षेत्र क्र.बी/२ अंतर्गत पुनावळे येथील पाण्याच्या उंच टाकीचे आऊटलेट हायवे क्रॉसिंग करून जुन्या लाईनला जोडणेकामी मे.बालाजी इंजिनियर्स (निविदा रक्कम रू.४४,६३,८११/- (अक्षरी र.रू.चव्वेचाळीस लाख त्रेसष्ट हजार आठशे अकरा) पेक्षा १४.९७% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३९,८५,३५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४५ विषय क्रमांक – ७
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६८/२०१५ दि.०२/०७/२०१५
२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११४दिनांक १७/०७/२०१५ नुसार, मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विषय - मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४६ विषय क्रमांक – ८
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६९/२०१५ दि.०२/०७/२०१५
२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११५ दिनांक १७/०७/२०१५ नुसार,

विषय - मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४७ विषय क्रमांक – ९
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/०४/५४४/२०१५ दि.२७/७/२०१५

विषय- पिं.चि.मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र, से.२३ पाणीपुरवठा विभाग या लेखाशिर्षामधून भांडवली विषयक कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबत... (वाढ/घट र.रू.२,६३,९५,०००/-)

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४८ विषय क्रमांक – १०
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२५/२०१५ दि.२८/७/२०१५

विषय - प्रभाग क्र.६ डुडुळगाव टाकीवरुन वितरण होणा-या भागात जलवाहिनी टाकणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१४९ विषय क्रमांक – ११
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३४३/२०१५ दि.३०/०७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.११/२/२०१४-१५ मधील अ.क्र.२ अन्वये, जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथे टप्पा क्र.१ व २ पाणी शुद्धीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या लाईम (Super Hydrated Lime Purity 90 % and Above) खरेदी करणेकामी मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचा विषयांकीत कामासाठी र.रू.११,५००/- प्रती मे. टन दराने येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास र.रू.१,९८,६०५/- (अक्षरी र.रू. एक लाख अठ्ठ्याण्णव हजार सहाशे पाच फक्त) निविदा स्विकृतीस मा.आयुक्त यांनी दि.१७/६/१५ रोजी मान्यता दिलेली असून त्यानुसार त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२१५० विषय क्रमांक – १२
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/३४७/२०१५ दि.३०/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामावरील बांधकामांना नोटीसा बजाविणे व निष्काषनाची कारवाई करणेबाबत दक्षता व नियंत्रण कक्ष यांचेकडील दि.२५/५/२०१५ चे पत्रानुसार दि.१/६/२०१५ ते १५/६/२०१५ पर्यंत व्हिडीओ शुटिंग व फोटोग्राफीची व्यवस्था माहिती व जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आली होती. मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी, पुणे-२७. यांच्याकडून व्हिडीओ शुटिंगचे काम एका दिवसातील एका कार्यक्रमाचे शुटिंग करुन डाटा डीव्हीडी सह र.रु.२,३००/- व त्यापुढील जास्तीच्या रेकॉर्डीगसाठी प्रती १ तास डाटा डिव्हीडी करीता र.रु.७००/- या दराने करुन घेण्यात आलेले आहे. सदरच्या दरास मा.स्थायी समितीने ठराव क्र.११४७५ दि.१२/५/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब, सदर कामासाठी र.रु.९१,१००/- (अक्षरी र.रु.एक्यान्नव हजार शंभर फक्त) इतका खर्च आला असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५१ विषय क्रमांक – १३
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१अ/कावि/४५९/२०१५ दि.३१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.जगदीश श्रीखंडे, डॉ.उमा पारधी व डॉ.वैशाली साठे नेत्र रोग तज्ञ यांना मानसेवी नेत्ररोग तज्ञ पदावर वाय.सी.एम. रुग्णालयात व डॉ.सीमा कामत, डॉ.मेहरा श्रीखंडे नेत्र रोग तज्ञ यांना तालेरा रूग्णालयात मानसेवी नेत्र रोग तज्ञ पदावर दरमहा एकत्रित मानधनावर आदेशाच्या दिनांकापासुन ६

महीने या कालावधीसाठी प्रतिमहा र.रु. ५,०००/- (अक्षरी र.रू.पाच हजार) एकत्रित मानधनावर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५२ विषय क्रमांक – १४
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक-मा.मा.संपत पवार अनुमोदक–मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०२/२०१५ दि.२९/७/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२९.६.२०१५ ते दि.५.७.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०२/२०१५ दि.२९.७.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५३ विषय क्रमांक – १५
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०३/२०१५ दि.२९/७/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.६.७.२०१५ ते दि.१२.७.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०३/२०१५ दि.२९.७.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५४ विषय क्रमांक – १६
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०४/२०१५ दि.२९/७/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३.७.२०१५ ते दि.१९.७.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०४/२०१५ दि.२९.७.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५५ विषय क्रमांक – १७
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३६४/२०१५ दि.३१/०७/२०१५
विषय - प्रभाग क्र.६ मोशी पुर्व व पश्चिम बनकरवस्ती भागात जलनलिका टाकणेबाबत...

विषय क्रमांक १७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५६ विषय क्रमांक – १८
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/७५/२०१५ दि.१/८/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४५/२०१४-१५ मधील काम क्र.९ अन्वये, प्र.क्र.३० चक्रपाणी वसाहत मध्ये किरकोळ दुरूस्ती व देखभालची कामे करणेकामी मे.शिवगंगा कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. २३,३१,०५४/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख एकतीस हजार चोपन्न) पेक्षा ४२.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १४,१९,६१२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/७४/२०१५ दि.१/८/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४५/२०१४-१५ मधील काम क्र.१४ अन्वये, प्र.क्र.६ मोशी संत ज्ञानेश्वरनगर व इंद्रलोक कॉलनी मधील रस्ते खडीमुरूमाने दुरूस्त करणेकामी मे.सुयोगराज कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. २१,००,६०१/- (अक्षरी र.रू. एकवीस लाख सहाशे एक) पेक्षा ४२.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१२,७९,२६६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५८ | विषय क्रमांक – २०
दिनांक – ११/०८/२०१५ | विभाग – स्थापत्य
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे | अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/७६/२०१५ दि.३/८/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४५/२०१४-१५ मधील काम क्र.१० अन्वये, प्र.क्र.३२ सँडविक कॉलनी मध्ये आरक्षण क्र.४०१ येथे हॉस्पिटल बांधणेकामी मे.सुनिल अन्नाप्पा सुर्यवंशी (नि.र.रु.२४,९५,०१६/- (अक्षरी र.रू.चोविस लाख पंच्यान्नव हजार सोळा) पेक्षा १५.१५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२२,२२,८७२/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१५९ | विषय क्रमांक – २१
दिनांक – ११/०८/२०१५ | विभाग – पाणीपुरवठा
सुचक-मा.मा.संपत पवार | अनुमोदक–मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३६७/२०१५ दि.३/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र. १८/३३/२०१४-१५मधील अ.क्र १०अन्वये अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथे ए.पी.एफ.सी. पॅनेल बसविणेकामी मे.एम.बी. इलेक्ट्रिक अँड कंपनी (निविदा रक्कम रू.३२,५३,७२६/- (अक्षरी र.रू. बत्तीस लाख त्रेपन्न हजार सातशे सव्वीस फक्त) पेक्षा ९.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३१,०८,९३५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६० | विषय क्रमांक – २२
दिनांक – ११/०८/२०१५ | विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक-मा.रमा ओव्हाळ | अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.ई-ग/९/कावि/३५०/२०१५ दि.३/८/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सर्व कामकाज ऑनलाइन पध्दतीने करणेत आलेले आहे. त्याकामी विविध प्रणाली विकसीत करणेत आलेल्या आहेत. त्यापैकी 1)Property Tax Management (2)Water Tax Management (3)Asset And Works Management (4)e-Tendering या चार संगणक प्रणालींचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी दि.११.०४.२०१५ रोजी पूर्ण होणार आहे. तसेच उर्वरीत ३६ संगणक प्रणालींचा कालावधीही क्रमाक्रमाणे पुर्ण होणार आहे. वरील चार संगणक प्रणालींचा कालावधी

पूर्ण झालेने एक वर्षासाठी दोन Developer नियुक्त करणेकामी निविदा सुचना क्र.०६/२०१५-१६ अन्वये निविदा प्रसीध्द करणेत आली होती. त्यामध्ये एकुण चार निविदा धारकांनी भाग घेतला होता. मे.टेक ९ सर्व्हीसेस यांची निविदा कागदपत्रांच्या अभावी अपात्र करणेत आली असुन उर्वरीत तिन पात्र निविदाधारक १)प्रिया टेक सोल्युशन (२)मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (३)प्रॉबिटी सॉफ्टवेअर यांचे पाकीट क्र.दोन दिनांक ३०.०७.२०१५ रोजी निविदा कमिटीसमोर पाकीट क्र.२ उघडणेत आले असुन त्यामध्ये मे.प्रिया टेक सोल्युशन यांचे दर लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. एका Developer साठी एका महीन्यासाठी र.रु.३६,३६०/- प्राप्त झालेले असुन दोन Developer नियुक्त करणेसाठी एका वर्षासाठी र.रु.८,७२,६४०/- (अक्षरी र.रू. आठ लाख बहात्तर हजार सहाशे चाळीस) एवढा खर्च येणार आहे. मे.प्रिया टेक सोल्युशन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८०% कमी आलेले आहेत. सदरचे खर्चास व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६१ विषय क्रमांक – २३
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – वैद्यकीय
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/३/कावि/५३६/२०१५ दि.३/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वैद्यकीय विभाग मुख्य कार्यालयाकडील "वैद्यकीय प्रतिपुर्ती" या लेखाशिर्षामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी र.रू.३,००,००,०००/- तरतूद करणेत आली आहे. सदर लेखाशिर्षामधुन मनपा कर्मचा-यांची वैद्यकीय खर्चाची बिले खर्ची टाकणेत येतात. सन २०१५-१६ मध्ये मनपा कर्मचा-यासाठी "धन्वंतरी स्वास्थ्य योजना" दि. ०१/०९/२०१५ पासून कार्यान्वित करणेत येणार आहे. सद्यस्थितीत वैद्यकीय प्रतिपुर्ती या लेखाशिर्षामध्ये केलेली तरतूद र.रू. ३ कोटी मधुन आज अखेर र.रू. २,४२,४३,०६४/- इतका खर्च झाला असून आज अखेर र.रु.५७,५६,९३६/- शिल्लक आहे. ती अपूरी पडत आहे. धन्वंतरी योजना माहे सप्टेंबर मध्ये चालू झाली तरीही कर्मचा-यांची वैद्यकीय प्रतिपुर्तीची पुर्वीची बिले अदा करावी लागणार आहे. त्यामुळे वैद्यकीय विभागाकडील "उपकरणे खरेदी" या लेखाशिर्षावरील र.रु.११ कोटी तरतुदी पैकी र.रु.१ कोटी तरतूद "वैद्यकीय प्रतिपुर्ती" या लेखाशिर्षामध्ये वर्ग करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०३ अन्वये वैद्यकीय विभागाकडील "वैद्यकीय प्रतिपुर्ती" या लेखाशिर्षामध्ये र.रु.१ कोटी तरतूद "उपकरणे खरेदी" या लेखाशिर्षामधुन वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६२ विषय क्रमांक – २४
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- १) मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/६७४/२०१५ दि.३/८/२०१५
२) मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/७००/२०१५ दि.११/८/२०१५

विषय – कामगार कल्याण विभागासाठी सेवानिवृत्ती सन्मानचिन्हे साहित्य खरेदीबाबत...

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.२४ कामीचा मा.सह आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६३ विषय क्रमांक – २५
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१०५/२०१५ दि.४/८/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२०.७.२०१५ ते दि.२६.७.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०५/२०१५ दि.४.८.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६४ विषय क्रमांक – २६
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/६५/१५ दि.४/८/२०१५
विषय - प्र.क्र.३८ इ. ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक २६चा विचार दिनांक १५/०९/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६५ विषय क्रमांक – २७
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकिय
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/२/कावि/२०९/२०१५ दि.२०/७/२०१५

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहराचे कार्यक्षेत्रामध्ये डेंग्युचा प्रसार होऊ नये याकरिता उपाययोजना करणेकामी मा.आयुक्त सो यांचे दि.१५/७/१५ चे आदेशान्वये दि.२०/७/१५ ते २३/७/१५ या कालावधीत ४ दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपात वाहन पुरविणेकामी कोटेशन पध्दतीने दर मागवुन वाहने पुरविणेस व तातडीक बाब असलेने खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा. आयुक्त सो यांची मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार कोटेशन नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. याकरिता तीन कोटेशनधारकांनी सहभाग घेतला आहे. त्याचा तपशिल खालील तक्त्याप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **नाव** | **प्रवास किमी** | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रति दिवस ताशी ८० कि.लो. | प्रति तास | एक्स्ट्रा कि.मी. साठी प्रति. कि.मी. |
| 1 | विनायक टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, निगडी, पुणे | 1800/- | 60/- | 12 |
| 2 | जॉय टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, पिं. सौदागर, पुणे | 1550/- | 60/- | 12/- |
| 3 | सिध्दी टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, पिंपरी, पुणे | 1490/- | 50/- | 10/- |

उपरोक्त कोटेशनधारकांपैकी सिध्दी टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, पिंपरी पुणे यांनी प्रति दिन ताशी ८० कि.मी. साठी र.रु.१,४९०/- व प्रति तासाकरिता ५०/- तसेच पुढील जादा किलो मिटरसाठी र.रु.१०/- असा लघुत्तम दर सादर केला आहे. प्राप्त लघुत्तम दरानुसार चार दिवसांसाठी सात वाहने प्रति दिनी ८० कि.मी. प्रमाणे र.रु.१,४९०/- असे एकुण र.रु.४१,७२०/- इतका खर्च अपेक्षित आहे. तातडीक बाब असलेने मे.सिध्दी टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स यांना पुरवठा आदेश क्र.मसाभां/२/कावि/२०९/२०१५ दि.२०/७/१५ अन्वये वाहन पुरविणेकामी आदेश देणेत आलेला आहे. भाडेतत्वावरील या वाहनांकरिता होणारा अपेक्षित खर्च सात वाहनांकरिता 'शासकिय योजनांची अंमलबजावणी'या लेखाशिर्षातुन करता येणे शक्य आहे. त्यानुसार मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-ऱ्या वाहन भाडेतत्वावर घेणेस व येणा-ऱ्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६६ विषय क्रमांक – २८

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक–मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. ई-गव्हर्नन्स/९/कावि/३५२/२०१५ दि.५/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील संगणकीय यंत्रणा सुस्थितीत राहून महापालिकेचे प्रशासकीय व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे होण्यासाठी संगणक यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे होणे आवश्यक आहे. तसेच संगणक यंत्रणा नादुरुस्त झाल्यास अथवा त्यामध्ये बिघाड झाल्यास सदर यंत्रणेची त्वरीत दुरुस्ती करुन कार्यालयीन कामकाज सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी संगणक यंत्रणेची सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा सूचना क्रमांक०१/२०१५-१६ वर्तमानपत्रे व इंटरनेटवर प्रसिध्द करण्यात आली होती. एकूण ३ ठेकेदारांनी महापालिकेतील संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्ती विषयक कामासाठी ई-टेंडरींगद्वारे निविदा दाखल केली आहे. मे.झुम कम्प्युटर्स पुणे यांनी सर्वात कमी दर रक्कम रुपये ४४,५१,४००/- सादर केला असून तो इतर निविदा धारकांपेक्षा कमी आहे.सदरचा दर अंदाजपत्रकीय दरा पेक्षा १६.१७ % ने कमी आहे. सबब मे.झुम कम्प्युटर्स पुणे यांना सन 2015-16 या वार्षीक कालावधीत महापालिकेची संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्तीचे काम एक वर्ष कालावधीसाठी देण्यास तसेच त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रुपये ४४,५१,४००/- (अक्षरी र.रू. चव्वेचाळीस लाख एक्कावन्न हजार चारशे) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६७ विषय क्रमांक – २९

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/९९१/२०१५ दि.४/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/HO/६/३/२०१५-१६ अन्वये, नाशिक फाटा ते वाकड या बी.आर.टी.एस. कॉरीडॉर वरील विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता फुटपाथचे

चर पुर्ववत करणेकामी मे.धनेश्वर कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु. ४,६६,८५,३४१/- (अक्षरी र.रू.चा कोटी सहासष्ट लाख पंच्याऐंशी हजार तीनशे एक्केचाळीस) पेक्षा २१.२१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३,८६,२२,५४९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फ़रकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६८ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/५१६/२०१५ दि.४/८/२०१५

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या १८ माध्यमिक विदयालये व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कासारवाडी मधील एकूण ९,३६२ विदयार्थ्यांना १५ ऑगस्ट २०१५ रोजी स्वातंत्र्य दिना निमित्त खाऊ म्हणून ६६ ग्रॅम वजनाचे ब्रिटानिया गुड डे रिच बटर बिस्कीट पुडे प्रति नग र.रु.९.०९ या दराने एकूण र.रु.८५,१००/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्याऐंशी हजार शंभर फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास तसेच नामांकित कंपनी ब्रिटानिया या उत्पादित कंपनीचे पिंपरी चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.भक्ती एंटरप्रायजेस, शिवतेजनगर, चिंचवड १९ यांचेकडून कंपनीच्या दरात बिस्कीटे करारनामा न करता, सरळ थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यांना सदरची रक्कम आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१६९ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई/गव्हर्नन्स-३/कावि/८२/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत राबविलेल्या सारथी उपक्रमाच्या धर्तीवर पुणे महानगरपालिके मार्फत तशाच प्रकारचे कॉल सेंटर कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. सदरचा उपक्रम हा पुणे महानगरपालिकेमध्ये प्रथमच चालू करावयाचा असुन त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील सद्दस्थितीत चालू असलेल्या सारथी कॉल सेंटरचे कामकाज कोणत्याही परिस्थितीत विस्कळीत न होता तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व संसाधने अंशत: वापरुन पुणे महानगरपालिकेचे कॉल सेंटर प्रायोगिक तत्वावर सुरु करणेबाबत परवानगी मिळणेस विनंती केली आहे. सदरचे कॉल सेंटर प्रथमत: ६ महिने कालावधीसाठी सुरु करणेसाठी तसेच ऑपरेटर्ससाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत आयुक्त, पुणे म.न.पा. यांनी पत्रान्वये विनंती केली आहे. सदरच्या कामासाठी वापरल्या जाणा-या पायाभूत सुविधांचा अंशत: वापर करुन सदरचे कॉल सेंटर सुरु करण्यास संमती मिळणेबाबत परस्पर सांमजस्य करार (MoU) पुणे महापालिकेतर्फे करण्यात येणार आहे. सदरप्रमाणे पुणे म.न.पा.चे कॉलसेंटरकरीता आवश्यक संगणक यंत्रणा, कॉल सेंटर Neon Software License Copy 6 Nos.,

हेडफोन, PRI लाईन, Grievance Monitoring System इत्यादी पुणे म.न.पा.ने पुरविण्यात यावी. कॉलसेंटर साठी लागणारी जागा व सर्व्हर फक्त ६ महिने कालावधीसाठी पिंपरी चिंचवड महापालिके तर्फे पुरविला जाणार आहे. सदरची बाब धोरणात्मक असल्याने त्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – १२१७० विषय क्रमांक – ३२
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – स्थापत्य बी.आर.टी.एस.
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/८१६/२०१५ दि.१०/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

रेल्वे प्रशासनाकडील नवीन निर्धारीत नियमांनुसार व भविष्यातील मुंबई पुणे लोहमार्गाचे विस्तारीकरण करणेची आवश्यकता इ. बाबींमुळे रेल्वेवरील उड्डाणपुलाची लांबी (Span) वाढत आहे. त्यामुळे रेल्वेवरील उड्डाणपुलाचे अंदाजपत्रक स्थापत्यविषयक सल्लागार यांजकडुन फेरसादर करण्यात आले असून रेल्वे उड्डाणपुलाची (ROB) अंदाजपत्रकीय रक्कम रु.२८,८३,८७,५१६/- येत आहे. या रकमेनुसार CODAL & MAINTENANCE Charges Sr.DFM/PA, मध्य रेल्वे यांचे नावे खालीलप्रमाणे अदा करणेबाबत मध्य रेल्वे विभागाकडुन दि.०८/०७/२०१५ रोजीच्या पत्रानुसार महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| P & E Charges (2%) | - | Rs.57,67,750/- (Rs.31,16,646 deposited) |
| P & G Charges (6.25%) | - | Rs.1,80,24,220/- |
| Maintenance Charges (30%) | - | Rs.8,65,16,255/- |
| Way Leave Charges – (10 years) | | Rs.1,20,000/- |
| 2 gang Men charges for protection | | Rs.50,000/- |
| Total | | **Rs.11,04,78,225/-** |

रेल्वे उड्डाणपुलाची अंदाजपत्रकीय रक्कम वाढल्यामुळे मध्य रेल्वे विभागास अदा करावयाच्या CODAL & MAINTENANCE Charges पैकी P & E Charges (2%) मध्ये वाढ होत आहे. दि.८/७/२०१५ रोजीच्या मध्य रेल्वे विभागाकडील पत्रानुसार मागणी करण्यात आलेल्या CODAL & MAINTENANCE शुल्कामधील P & E Charges (2%) साठी वाढीव (एकूण रु.५७,६७,७५०/- मधून यापूर्वी अदा केलेली र.रु.३१,१६,६४६/- वजा जाता उर्वरीत) र.रु.२६,५१,१०४/- मध्य रेल्वे विभागास त्वरीत अदा करणे आवश्यक आहे. तदनंतर मध्य रेल्वे विभागाकडुन रेल्वे उड्डाणपुलाचे संकल्पचित्र (GAD) मंजुर करण्यात येईल असे पत्राद्वारे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७०६४, दि.१७/६/२०१४ अन्वये मध्य रेल्वे विभागास अदा करावयाच्या र.रु.७,४२,७५,८५६/- एकत्रित मंजूरी घेण्यात आलेली आहे. तथापि मुकाई चौक, किवळे ते भक्ति शक्ति चौक निगडी या ४५ मी. रुंद रस्त्यावर देहुरोड ते आकुर्डी रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे किमी १७०/१६-१७ मधील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलासाठी (ROB) मध्य

रेल्वे पुणे यांचेकडे CODAL & MAINTENANCE Charges पैकी P & E Charges (2%) मध्ये होणा-या र.रु.२६,५१,१०४/- वाढीव मागणी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७१ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय, विद्युत

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/वि/जा/२६७/२०१५ दि.७/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.आयुक्त निवासस्थान, अविष्कार बंगला येथील १०० KVA क्षमतेचे जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कामाकरिता सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकामध्ये किरकोळ देखभाल दुरुस्ती (विद्युत मुख्य कार्यालय) या लेखाशिर्षाखाली पान क्रमांक ६९८ अनुक्रमांक ११ वर र.रु.५,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली आहे. सबब एकच स्थानिक अधिकृत एजन्सी असल्याने सदरचे काम पूर्वीप्रमाणेच निविदा न मागविता थेट पद्धतीने अधिकृत एजंसी (Service Agency) मे.ओंकार इंजि. वर्क्स चिंचवड यांचेकडून करारनामा करुन करवून घेण्यास व सदर कामाचा ३ वर्ष कालावधीकरिता खर्च र.रु.७३,१२२/- अक्षरी त्र्याहत्तर हजार एकशे बावीस आगाऊ अदा करणेस व दुरुस्ती करीता लागणा-या साहित्याचा खर्च त्या त्या वेळी दुरुस्ती कामकाज पूर्ण झाल्यानंतर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२४४/२०१५ दि.१०/८/२०१५

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१५-१६ मधील सन २०१५-१६ या वर्षामध्ये मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी मोठी रोपे खरेदी करणेबाबत मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन (निविदा रक्कम रुपये ३२,५०,०००/- अक्षरी र.रु.बत्तीस लाख पन्नास हजार फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा -३९.१० टक्के ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रु.१९,७९,२५०/- यास व त्यांचेशी करारनामा करुन घेणेस व प्रस्तुतकामी ६ महिने कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास तसेच मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१५-१६ मधील मनपाच्या वृक्षसंवर्धन विभागासाठी वृक्षारोपणाची मोठी रोपे खरेदी करणेबाबत मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन यांची निविदा रक्कम रुपये ३२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख पन्नास हजार फक्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा -३९.१०% ) ने कमी दराची निविदा स्विकारणेत आलेली आहे. सदरकामी त्याप्रमाणे येणारे पासष्ट लाखापर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात येत आहे तसेच मनपाच्या वृक्षसंवर्धन विभागासाठी लागणारी वाढीव ५००० नग मोठी रोपे (नि.नो.क्रं.१/२०१५-१६) निविदा मंजुर दराने खरेदी मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन यांचेकडून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७३ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक-मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/२/कावि/२४२/२०१५ दि.१०/८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या से.नं. २४ निगडी संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील उपहारगृह इमारत पहिला मजला ५ वर्ष कालावधीसाठी लिजदराने देणे बाबतच्या ई-निविदा सुचना क्र. १/२०१५-१६ अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर प्राप्त निविदापैकी सर्वोच्च लिजदरप्रमाणे मे.साईसेवा एंटरप्रायजेस यांचा र.रु.२७,१०,०००/- (अक्षरी- र.रु.सत्ताविस लाख दहा हजार फक्त) या प्रमाणे प्राप्त आहे. सदर मंजुर दराने ५ वर्ष कालावधीसाठी मे. साईसेवा एंटरप्रायजेस श्री.सुरेश नामदेव ढवळे यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस तसेच सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता मा.महापालिका सभेच्या उमेदमान्यतेवर ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७४ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ११/०८/२०१५ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक-मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक-मा.हिरानंद आसवाणी
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२४२/२०१५ दि.७/७/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.२/२०१५-१६ मधील सन २०१५-१६ या वर्षामध्ये मनपाचे दुर्गादेवी उद्यानातील झाडांचे खोडे काढणे, खड्डे खोदणे, रस्ता तयार करणेकामी पोकलेन भाड्याने घेणे व पोकलेन वाहतुक करणे मे.क्राप्ट कार्पोरेशन लिमिटेड (कोटेशन रक्कम रुपये १,९९,६००/- अक्षरी र.रु.एक लाख पन्नास नव्याण्णव हजार सहाशे फक्त या ठेकेदाराचे कोटेशन अंदाजपत्रकिय दरापेक्षा -१२ टक्के ही सर्वात कमी दराचे कोटेशन स्विकृत करणेत आले असून प्रस्तुतकामी १४० तास (दोन वेळेस पोकलेन वाहतूक करणे) कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७५ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ११/०८/२०१५
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके
संदर्भः- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.७.०० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७६ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

अंजली अरबट यांस मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवर नेमण्यास व त्यांस आर्किटेक्ट विषयक कामे देण्यास व त्याकामी होणारी फी वेळोवेळी आर्किटेक्ट कौन्सीलच्या नियमानुसार अदा करणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७७ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११७०२ दिनांक ९/६/२०१५ रद्द करण्यास व पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूदप्रमाणे वाढ,घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.८.२५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७८ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

धनंजय अनंत सालकर यांस मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवर नेमण्यास व त्यांस आर्किटेक्ट विषयक कामे देण्यास व त्याकामी होणारी फी वेळोवेळी आर्किटेक्ट कौन्सीलच्या नियमानुसार अदा करणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१७९ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-२०१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,१६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४२

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-२०१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.९००००००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८१　　　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४३

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-२०१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८२　　　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४४

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०२३ दिनांक २१/७/२०१५ रद्द करण्यास व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड क्षेत्रीय कार्यालय व मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१३.००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८३　　　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४५

दिनांक – ११/०८/२०१५

सुचक-मा.अनिता तापकीर　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील विशेष योजनेतील प्रस्तावात नमूद केलेल्या कामात वाढ-घट करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८४ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ११/०८/२०१५
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

क प्रभाग व क मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील विशेष योजना व भांडवली विषयक कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रु.७०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८५ विषय क्रमांक – ४७
दिनांक – ११/०८/२०१५
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३३.५० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८६ विषय क्रमांक – ४८
दिनांक – ११/०८/२०१५
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१३८ दि.४/८/२०१५ मधील “(वाढ र.रु.५,००,०००/-)” हा मजकूर वगळ्यात यावा व त्याऐवजी (वाढ र.रु.१९,००,०००/-) हा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२१८७ विषय क्रमांक – ४९
दिनांक – ११/०८/२०१५
सुचक-मा.अनिता तापकीर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

सावित्री महिला स्वयंरोजगार संस्था यांना ‘ड’ व ‘ब’ प्रभाग कार्यक्षेत्रातील टाटा एसी घंटागाडी मार्फत घरोघरचा कचरा उचलणे बाबतचे काम मिळाले असून त्या कामाकरीता ३ सुपरवायझर किमान वेतन कायद्यानुसार देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७७/२०१५
दिनांक - १२/०८/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.